DEPOSIT POLICY
2025-26

SJSB

SOLAPUR JANATA SAHAKARI BANK LTD, SOLAPUR

MULTISTATE SHEDULED CO-OP. BANK

सोलापूर जनता सहकारी बँक लि.,
(मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)
मुख्यालय: शिव-स्मारक, गोल्ड फिंच पेठ
सोलापूर 413007

बँक डिपॉझिट पॉलिसी – 2025-2026

जनतेकडून ठेवी(डिपॉझिट) स्वीकारणे हे बँकिंग व्यवसायाचे अत्यंत महत्वाचे मुलभूत व प्राथमिक असे कार्य आहे. बँकिंग नियंत्रण कायदा 1949 च्या कलम 5 (b) प्रमाणे बँकिंगची व्याख्याच अशी आहे कि " कर्ज देणे किंवा गुंतवणूक करणे या उद्धेशाने जनतेकडून ठेवी स्वीकारणे कि ज्या मागणी केल्यानंतर देय राहतील आणि चेक, ड्राफ्ट, आदेशान्वये व अन्य मार्गाने काढून घेता येतील" त्यामुळे ठेवीदार व त्यांचे हितसंबंध यांना सर्वोच्च महत्व व प्राधान्य बँकिंग प्रणालीत देण्यात आलेले आहे.

जनतेकडून ठेवी स्वीकारणे व ठेव खात्याचे संचलन करणे या संदर्भातील अनुषंगिक नियम व धोरण बँकेने बनविण्याची आवश्यकता रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये प्रतिपादीत करण्यात आली आहे. त्यानुसार बँकेने आपली डिपॉझिट पॉलिसी बनविली आहे. सदरची डिपॉझिट पॉलिसी सर्वसाधारणपणे मार्गदर्शक स्वरूपाची असून ठेवीचे विविध प्रकार, ठेव स्वीकृती व त्यासंदर्भात सर्वसाधारण पद्धती, व्याज आकारणी, ठेव खात्याचे संचलन, ठेव खाते मुदतीनंतर वा मुदतपूर्व बंद करणे, मयत ठेवीदाराच्या रकमेचे पेमेंट (स्वतंत्र धोरण ठरवीले आहे), ठेवीच्या तारणावर कर्ज देणे यासारख्या व इतर संदर्भीय बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. पॉलिसी तयार करताना भारतीय रिझर्व्ह बँकेने ठेव खात्यासंदर्भात वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचना, परिपत्रके, मास्टर सर्क्युलर व आपल्या बँकेतील प्रचलित कार्यपद्धती यांचा आधार घेण्यात आलेला आहे. रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या सुधारित परिपत्रकानुसार हे धोरण बदलले जाईल.

सदरची डिपॉझिट पॉलिसी स्वीकृत करताना बँक, आपल्या प्रत्येक ठेवीदाराचे हक्क व हितसंबंध सुरक्षित ठेवण्याची व ठेविदारास पारदर्शक, व पक्षपातविरहित सेवा देण्याची आपली बांधिलकी अधोरेखित करीत आहे. सदरची डिपॉझिट पॉलिसी ही केवळ मुलभूत मार्गदर्शक स्वरूपाची असल्याने बँक विविध ठेव योजना व त्यांचे नियम आणि अन्य अनुषंगिक सेवा-सुविधा, नियम, कार्यपद्धती याबाबत वेळोवेळी प्रसंगानुरूप निर्णय घेईल. आणि या संदर्भातील सूचना संचालक मंडळाच्या मंजुरीस अधीन राहून परीपत्रकांच्या माध्यमातून शाखांना त्या त्या वेळी कळविण्यात येतील.

ठेवीचे प्रकार:

बँकेतील ठेवखात्यांची विभागणी सर्व साधारणपणे तीन प्रकारात केली जाते:

१) **डिमांड डिपॉझिट्स/चालू खाते (Current Accounts)** म्हणजे खातेदाराने मागणी केल्यानंतर त्यास देय होणारी ठेव.बँकेतील चालू खाती अर्थात् करंट अकौंट्स यांचा समावेश डिमांड डिपॉझिट म्हणून करण्यात येतो.

२) **सेव्हींग्ज ठेवी (बचत खाती)** या खात्यातून ठेवदारास किती वेळा रक्कम काढता येईल यावर बँकेकडून कांही निर्बंध घालण्यात येतात. तसेच बँकेच्या परवानगीने ठेवीदारास कांही निश्चित कालावधीत रक्कम काढण्याची सोय असते.

३) **टर्म डिपॉझिट्स (मुदतबंद ठेवी)** म्हणजे बँकेने कांही निश्चित कालावधीसाठी स्वीकारलेली ठेव होय. अशी ठेव मुदत संपल्यानंतर देय होते. आपल्या बँकेत खालील प्रकारच्या ठेवींचा समावेश टर्म डिपॉझिट्सअंतर्गतहोतो.

a) मुदत ठेव
b) कॅश सर्टिफिकेट
c) आवर्तकठेव (Recurring Deposit)
d) संक्षेप ठेव योजना (Pigmy deposit)
e) आयकर कायदा 1961 चे कलम 80 सी अंतर्गत ठेव व्याज माफ असणारी स्वतंत्र ठेव योजना
f) अन्य विशेष ठेव योजना

SOLAPUR JANATA SAHAKARI BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK SOLAPUR

याशिवाय ग्राहकांची सोय व गरज लक्षात घेऊन बँक वेळोवळी टर्म डिपॉझिट्सच्या अन्य नवीन योजना तयार करेल व त्यांचा समावेश यात करण्यात येईल

संस्था व बिगर संस्था खातेदार:
बँकेतील सर्व प्रकारच्या ठेव खातेदारांची विभागणी १) संस्था खातेदार २) बिगर संस्था खादेदार अशा दोन प्रकारामध्ये करण्यात येईल.

१) संस्था : या मध्ये कोणत्याही प्रकारची व्यावसायिक फर्म, भागीदारी फर्म, प्रायव्हेट लिमिटेड किंवा पब्लिक लिमिटेड कंपनी/सहकारी संस्था/विश्वस्त संस्था/हिंदू अविभक्त कुटुंब (HUF)/ असोसिएशन किंवा क्लब/ आणि प्रचलित कायद्याने स्थापन झालेली कोणतीही संस्था.

२) बिगर संस्था: भारताचे नागरिक असलेली कोणतीही व्यक्ती, वैयक्तिक किंवा संयुक्तपणे.

खाते उघडण्याची पद्धती.

१) कोणतेही ठेव खाते उघडू इच्छिणाऱ्या व्यक्तीस/संस्थेस रिझर्व्ह बँकेने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार व बँकेस मान्य होईल अशा **Know Your Customer Policy (KYC)**अंतर्गत बँकेच्या अधिकाऱ्याचे समाधान होईल अशी अन्य तत्सम कागदपत्रे, आयकर कायद्यानुसार फॉर्म क्र. 60 कागदपत्रे बँकेच्या आवश्यकतेनुसार द्यावी लागतील. **रु. 50000/- व त्यावरील मुदत ठेव ठेवायची असल्यास PAN नंबर आवश्यक असेल.** त्याच बरोबर संस्थेचे भागीदार/संचालक/विश्वस्त/व्यवस्थापकीय अधिकारी/खाते चालविण्याचे अधिकार असलेली व्यक्ती यांच्या बाबतीत **KYC** निकषांनुसार त्यांची वैयक्तिक ओळख सिद्ध करणारी वैधानिक कागदपत्रे व फोटो इ. खाते उघडताना आवश्यक राहील. **खाते उघडताना इतर कोणाच्या ओळखीची आवश्यकता नाही.**
खाते उघडण्यासाठीच्या फॉर्मवर **(Account Opening Form)**खाते उघण्यास आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी देण्यात यावी व त्यानुसार खातेदाराकडून कागदपत्रे घेण्यात यावीत. शिवाय,बँकेत आलेल्या व्यक्तीस या बाबतची सविस्तर माहिती बँकेतील/शाखेतील अधिकारी देतील. जी व्यक्ती KYC साठी आवश्यक कागदपत्रे देवू शकणार नाही, तिचे खाते उघडून घेण्यास नकार देण्याचा अधिकार बँकेस आहे. काही ठराविक अंतराने वरील कागदपत्रे खालील प्रमाणे आर बी आय ने ठरवून दिलेल्या त्या त्या रिस्क कॅटेगरी नुसार द्यावी लागतील:

अ) लो रिस्क कॅटेगरी खातेदारांसाठी : दर 10 वर्षांनी वरील प्रमाणे कागदपत्रे व लेटेस्ट फोटो द्यावयाचे आहेत .

ब) मध्यम रिस्क कॅटेगरी खातेदारांसाठी : दर 08 वर्षांनी वरीलप्रमाणे कागदपत्रे व लेटेस्ट फोटो द्यावयाचे आहेत .

क) हाय रिस्क कॅटेगरी खातेदारांसाठी : दर 2 वर्षांनी आय डी प्रुफ , अ‍ॅड्रेस प्रूफ फोटो इ. कागदपत्रे द्यावयाची आहेत.

ख) अज्ञान खातेदाराबाबत तो सज्ञान होताच नवीन फोटो व नमुना सही घेतली जाईल .

२) अ)खाते उघडण्यासाठी विहित नमुन्यातील खाते उघडण्याचा अर्ज **(Account Opening Form),** सही नमुना कार्ड इ. बँकेकडून पुरविण्यात येतील. सदरचा फॉर्म पूर्णपणे भरून

SOLAPUR JANATA SAH BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK SOLAPUR

देवून व अर्जावर नमूद केलेली माहिती व आवश्यक कागदपत्रे बँकेत तपासणीसाठी व रेकॉर्डसाठी दाखल केल्यानंतरच ठेव खाते उघडून घेण्यात येईल. खातेदाराने फॉर्मवर आणि नमुना सही कार्डवर बँकेच्या अधिकाऱ्यासमोर सह्या करणे आवश्यक राहील. अपवादात्मक प्रसंगात खातेदार बँकेत येण्यास असमर्थ असेल तर बँकेचे अधिकारी/प्रतिनिधी संबधित खातेदाराच्या घरी/कार्यालयात वा खातेदाराने सांगितलेल्या ठिकाणी येऊन सह्या घेतील.

ब) खातेदारांना दिला जाणारा छापील अकौंट ओपनिंग फॉर्ममधील खातेदारांची वैयक्तिक माहिती ऐच्छिक आहे, मात्र बँकेस आवश्यक असेल तेव्हा अशी माहिती देणे हे खातेदारांवर बंधनकारक राहील. अशी माहिती न दिल्यास त्याचे खाते चालू ठेवणे अथवा रक्कम देणे बाबतचा अधिकार बँक राखून ठेवत आहे.

३) सेव्हींग्ज ठेव व चालू ठेव यासारख्या खात्यासाठी, बँक वेळोवेळी ठरवेल त्यानुसार खात्यात किमान शिल्लक रक्कम जमा ठेवणे खातेदारावर बंधनकारक राहील. बँकेच्या नियमानुसार किमान शिल्लक रक्कम जमा न ठेवल्यास खातेदारास दंडात्मक स्वरुपात, बँकेने ठरविल्यानुसार शुल्क आकारण्याचा अधिकार बँकेस आहे. त्याचप्रमाणे चेक बुक चार्जेस, ट्रॅन्झॅक्शन चार्जेस, फ़ोलिओ चार्जेस, खाते उतारा देण्यासाठी शुल्क व अन्य कांही सेवा शुल्क आकारण्याचा अधिकार बँकेस आहे व त्या संदर्भात बँक वेळोवेळी निर्णय घेईल. या संदर्भातील सविस्तर माहिती खाते उघडणेच्या वेळी खातेदारास देण्यात येईल.

४) सेव्हींग्ज खात्यावर होणाऱ्या विथड्रॉवलच्या व्यवहाराची कमाल मर्यादा ठरविणे, खात्यातील रोख व्यवहाराची मर्यादा ठरविणे याबाबत बँक वेळोवेळी निर्णय घेईल व त्यानुसार खात्यावरील व्यवहारावर नियंत्रण ठेवण्यात येईल.

❖ **ठेव खाते प्रकार, खाते कोणास उघडता येईल व खात्यावरील व्यवहार इ**.

१) चालू खाते (Current Accounts) : चालू ठेव प्रकारातील ठेव खाते भारताचे नागरिक असलेली कोणतीही सक्षम व्यक्ती/ व्यक्तिगत व्यावसायिक संस्था/भागीदारी संस्था/ प्रायव्हेट लिमिटेड किंवा पब्लिक लिमिटेड कंपनी/सहकारी संस्था/विश्वस्त संस्था/हिंदू अविभक्त कुटुंब (HUF)/असोसिएशन किंवा क्लब आणि प्रचलित कायद्याने स्थापन झालेली कोणतीही संस्था इ. उघडू शकतील.

यात जास्तीतजास्त ग्राहक आकर्षित व्हावेत म्हणून काही सवलती देवू करून काही चालू खाती नवीन पद्धतीने उघडता येतील. उदा.स्पेशल करंट खाते – ज्यात काही शिल्लक अनिवार्य करून चार्जेस फ्री, neft free अशा सवलती देवून उघडणेची . या प्रकारच्या योजना करून त्यास संचालक मंडळाची मान्यता घेणेची . अशी शिल्लक मिनिमम न राखल्यास किंवा मिनिमम शिल्लकेतून क्लियरिंग मधून चेक पास करणे आवश्यक झाल्यास हि सवलत काढून घेतली जाईल व त्यापुढे चार्जेस वसुली सुरु केली जाईल .

तसेच बिल्डर व्यवसायिकसाठी शेड्युल्ड बँक म्हणून आपली बँक पात्र असल्याने तशी ठेव योजना आपल्यास लागू करता येईल.

काही खातेदारांना आपण सरकारी कामांकरिता कर्ज दिले असल्याने (उदा.HAM प्रोजेक्ट वगैरे) त्यात अंतर्भूत असल्याने आपल्या बँकेला ESCROW खाते उघडण्याची गरज प्रकर्षाने जाणवू लागली. यामुळे आपले CASA डीपॉझीटही वाढते आणि आपण हि गरज पूर्ण करू शकत असल्यामुळे नवीन ग्राहकवर्ग येण्याची शक्यता वाढली आहे.याची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे राहील:-

SOLAPUR JANATA SAH BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK SOLAPUR

1. सदर खाते उघडण्यापूर्वी एक शासकीय व एक नियोजित खातेदार यांचा escrow करार झाला असला पाहिजे . तो योग्य त्या stamp वर योग्य त्या सक्षम सरकारी अधिका-यासमोर नोंदवलेला असला पाहिजे.

2. सदर करारातील अटीं व शर्तीबरहुकुम खातेवरील व्यवहार होवू देणे हि बँकेच्या संबंधित शाखा व्यवस्थापकाची “Escrow Agent” म्हणून जबाबदारी असेल . त्याच्या रजेच्या मुदतीत शाखेतील दुय्यम अधिकारी हि जबाबदारी पार पाडेल . यासाठी एच ओ कडे वरिष्ठ अधिकायाचे मार्गदर्शन घेणेचे आहे.

3. सदर अकौंटवर कराराप्रमाणेच व्यवहार होतील हा याचा महत्त्वाचा भाग आहे.त्याचे तंतोतंत पालन करणे अनिवार्य आहे.

- **रिअल इस्टेट (रेग्युलेशन अँड डेव्हलपमेंट) ॲक्ट (RERA):-**

रिअल इस्टेट (रेग्युलेशन अँड डेव्हलपमेंट) ॲक्ट (RERA) अंतर्गत, विकासकाने त्यांच्या ऑपरेशन्ससाठी किती चालू खाती उघडली पाहिजेत यावर कोणतेही विशिष्ट आदेश नाहीत. तथापि, गृहखरेदीदारांकडून गोळा केलेल्या निधीचा योग्य वापर सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक प्रकल्पासाठी समर्पित RERA एस्क्रो खात्याच्या देखभालीवर प्राथमिक लक्ष केंद्रित केले जाते. विकासक उघडू शकणाऱ्या चालू खात्यांची वास्तविक संख्या त्यांच्या ऑपरेशनल गरजा आणि अंतर्गत आर्थिक व्यवस्थापन पद्धतींवर अवलंबून असते.

- **RERA (रिअल इस्टेट रेग्युलेटरी अथॉरिटी) खाते उघडण्याची प्रक्रिया**

SJSB

RERA कायद्याचे पालन सुनिश्चित करण्यासाठी RERA खाते उघडण्याची प्रक्रिया आणि आवश्यकतांची माहिती खालीलप्रमाणे आहे:

1. **खात्यांचे प्रकार**:

   I. **संकलन खाते (Collection Account)** : हे प्राथमिक खाते आहे जिथे सर्व अलॉट्टींकडून गोळा केलेले 100% पैसे जमा केले जातात. यात चेक बुक किंवा डेबिट/क्रेडिट कार्ड सुविधा नाही. प्रत्येक दिवसाच्या शेवटी, 70% निधी RERA नामांकित खात्यात हस्तांतरित केला जातो आणि 30% प्रमोटरच्या ऑपरेटिव्ह खात्यात हस्तांतरित केला जातो.

   II. **RERA नामांकित खाते (RERA Designated Account)**: हे खाते विशिष्ट प्रकल्पासाठी वापरले जाते आणि RERA प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असते. हे संकलन खात्यातून 70% निधी प्राप्त करते आणि प्रकल्पाशी संबंधित खर्चासाठी वापरले जाते.

   III. **प्रमोटरचे ऑपरेटिव्ह खाते (Promoter's Operative Account)** : हे खाते संकलन खात्यातून उर्वरित 30% निधी प्राप्त करते आणि प्रमोटरच्या ऑपरेशनल खर्चासाठी वापरले जाऊ शकते. उदा. प्रशासकीय खर्च, पगार, ओव्हरहेड्स आणि इतर गैर-प्रकल्प-विशिष्ट खर्चांसह सामान्य व्यवसाय खर्च व्यवस्थापित करते.

SOLAPUR JANATA SAH BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK SOLAPUR

2. <u>**खाते उघडण्याची प्रक्रिया**</u>:

- KYC आणि AML अनुपालन: बँक RBI च्या Know Your Customer (KYC) आणि Anti-Money Laundering (AML) आवश्यकतांचे पालन करेल.

- विशेष करार: बँक आणि प्रमोटर यांच्यात विशेष करार आवश्यक आहे, ज्यात नुकसान भरपाईच्या अटींचा समावेश आहे.

3. <u>**ऑपरेशनल मार्गदर्शक तत्त्वे (Operational Guidelines):**</u>

- व्याज : या खात्यांमधील शिल्लक सामान्यतः व्याज मिळणार नाही.

- लीन : या खात्यांमधील शिल्लक रकमेवर कोणताही लीन चिन्हांकित केला जाऊ शकत नाही.

- प्रत्येक प्रकल्पासाठी स्वतंत्र खाती: प्रत्येक प्रकल्पासाठी स्वतंत्र खात्यांचा संच असणे आवश्यक आहे.

<u>**4. प्रलेखन (Documentation):**</u>
- प्रकल्प नोंदणी: RERA प्राधिकरणाकडे प्रकल्प नोंदणी दरम्यान प्रकल्प-विशिष्ट खात्याचे तपशील सादर करणे आवश्यक आहे.

या मार्गदर्शक तत्त्वांमुळे अलॉट्टींकडून गोळा केलेले निधी प्रकल्पासाठी योग्य प्रकारे वापरले जातात आणि रेरा खात्यातून रक्कम काढण्यासाठी **CA प्रमाणपत्र आवश्यक** असते. हे प्रमाणपत्र **चार्टर्ड अकाउंटंट (CA)** द्वारे जारी केले जाते आणि त्यात प्रकल्पाच्या आर्थिक स्थितीची माहिती असते. हे प्रमाणपत्र प्रकल्पाच्या प्रगतीच्या टप्प्यानुसार निधी काढण्यासाठी वापरले जाते. रिअल इस्टेट व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणि जबाबदारी प्रदान केली जाते.

SJSB

२) **सेव्हिंग्ज ठेव खाते:** भारताचे नागरिक असलेल्या कोणत्याही सक्षम व्यक्तीस, व्यक्तिगत नावाने/संयुक्त नावाने, तसेच, रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी सूचित केलेल्या कोणत्याही संस्थेस खाते उघडता येईल. उलट अर्थाने रिझर्व्ह बँकेने प्रतिबंधित केलेल्या संस्थांचे खाते उघडून घेतले जाणार नाही. अज्ञानाच्या नावाने पालनकर्ते म्हणून अज्ञानाचे नैसर्गिक पालक उदा. वडील किंवा आई, आणि यापैकी कोणीही हयात नसल्यास कायद्याने नेमून दिलेले पालक (गार्डीयन) यांच्या नावाने सेव्हींग्ज ठेव खाते उघडता येईल.

तसेच 10 वर्षे पूर्ण वयाच्या व सही करता येणाऱ्या मुलास/मुलीस बचतीची सवय लागावी या दृष्टीने स्वतःच्या नावाने सेव्हिंग्ज व आवर्तक **(Recurring Deposit**) खाते उघडण्याची परवानगी देण्यात येत आहे. अशा सेव्हिंग्ज खात्यास दि. 21/04/2025 चे RBI सर्क्युलर क्र. RBI/2025-26/26, DOR.MCS.REC.17/01.01.003/2025-26 जोखीम व्यवस्थापन आणि ग्राहकांच्या योग्यतेच्या धोरणावर आधारित चेकबुक/एटीएम कार्ड देता येईल या शिवाय या खात्यावर रिझर्व्ह बँकेच्या सुचनेनुसार व्यवहार व शिल्लकीवर मर्यादा असणार आहेत.तसेच या खातेदारना कर्ज देता येणार नाही.

रिझर्व्ह बँकेच्या वित्तीय समायोजन **(Financial Inclusion**) योजने अंतर्गत समाजातील निर्धन व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना विनाखर्च व सहज-सुलभ बँकिंग सेवा प्रदान करण्यासाठी असलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार, बँकेने सुरु केलेल्या विशेष "**No Frill Account**" सेव्हिंग्ज खाते

SOLAPUR JANATA SAH BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK SOLAPUR

उघडला येईल. यामध्ये खातेदारास खाते उघडण्यासाठी व चालविण्यासाठी कसलीही शिल्लक रक्कम ठेवावी लागणार नाही. **(Zero balance Accounts)**

दि. 01-04-2025 रोजीच्या RBI परिपत्रकानुसार खालील यादीतील सोसायटी/ट्रस्ट/SHG (बचत गट) यांचे सेव्हिंग ठेव खाते उघडता येणार नाही.

1.	Primary Co-operative Credit Society which is being financed by the bank.
2.	Khadi and Village Industries Boards.
3.	Agriculture Produce Market Committees.
4.	Societies registered under the Societies Registration Act, 1860 or any other corresponding law in force in a State or a Union Territory except societies registered under the State Co-operative Societies Acts and specific state enactment creating Land Mortgage Banks.
5.	Companies licensed by the Central Government under Section 8 of Companies Act, 2013 or Section 25 of Companies Act, 1956 or under the corresponding provision in the Indian Companies Act, 1913 and permitted not to add to their names the words 'Limited' or the words 'Private Limited'.
6.	Institutions other than individuals, Karta of HUF and whose entire income is exempt from payment of income tax under the Income-tax Act, 1961.
7.	Government departments/ bodies/ agencies in respect of grants/ subsidies released for implementation of various programmes/ Schemes sponsored by Central Government/ State Governments subject to production of an authorization from the respective Central/ State Government departments to open savings bank account.
8.	Development of Women and Children in Rural Areas (DWCRA).
9.	**Self-Help Groups (SHGs), registered or unregistered, which are engaged in promoting savings habits among their members.**
10.	Farmers' Clubs – Vikas Volunteer Vahini – VVV.

SJSB

३) **मुदतबंद ठेवी (Term Deposits) :**बँकेच्या मुदत ठेवीच्या,त्या वेळी अस्तित्वात असलेल्या, कोणत्याही योजनेत व्यक्तिगत/संयुक्त नावाने ठेव खाते उघडता येईल. अज्ञानाच्या नावाने पालनकर्ते म्हणून अज्ञानाचे नैसर्गिक पालक उदा. वडील किंवा आई, आणि यापैकी कोणीही हयात नसल्यास कायद्याने नेमून दिलेले पालक (गार्डीयन) यांच्या नावाने देखील ठेव खाते उघडता येईल. त्याचप्रमाणे भागीदारी संस्था/ प्रायव्हेट लिमिटेड किंवा पब्लिक लिमिटेड कंपनी/सहकारी संस्था/विश्वस्त संस्था/हिंदू अविभक्त कुटुंब **(HUF)**/ असोसिएशन किंवा क्लब/प्रचलित कायद्याने स्थापन झालेली कोणतीही संस्था इ. यांना देखील मुदत ठेव खाते उघडता येईल. **रु. 50000/- व त्यावरील मुदत ठेव ठेवायची असल्यास PAN नंबर आवश्यक असेल.**

४) **संक्षेप ठेव योजना :** ज्या लोकांना व्यवसायातून दैनंदिन उत्पन्न मिळते, परंतु त्यांनी नियमित दैनंदिन बचत न केल्यास, त्यांची उत्पन्नाची सर्व रक्कम खर्च होते. म्हणून लहान व्यवसायिकांना दैनंदिन बचतीची सवय लावण्यासाठी ही ठेव योजना आहे. या योजनेत पिग्मी एजंट या व्यवसायिकांच्या घरी/ व्यवसायाच्या ठिकाणी दररोज भेट देऊन त्यांच्या ठरलेल्या रकमेचे संकलन करतो व अशी संकलित केलेली रक्कम त्याच दिवशी किंवा जास्तीतजास्त दुसऱ्या दिवशी त्या ठेव खातेदाराच्या बँकेमध्ये असलेल्या ठेव खात्यात जमा करतो.

SOLAPUR JANATA SAH. BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK SOLAPUR

- खाते उघडताना ठेवीदाराने आपली दैनंदिन ठेव रक्कम निश्चित करणे बंधनकारक राहील. किमान दैनंदिन ठेव रु.100 राहील. अधिकतम दैनंदिन ठेवीस कोणतीही मर्यादा नाही. खाते उघडताना प्रारंभी ठरलेली दैनंदिन ठेव ही दैनंदिन स्वरुपातच जमा करणे बंधनकारक राहील.

- दैनंदिन ठेव पिग्मी एजंटमार्फतच जमा करणे बंधनकारक राहील. ठेवीदार उपलब्धतेनुसार रोज त्याच्या प्रारंभिक निर्धारित रकमेपेक्षा कमी किंवा अधिक रक्कम जमा करू शकेल. या ठेव खात्याची मुदत सरसकट 12 महिने राहील. (नव्याने उघडणाऱ्या ठेव खात्यांसाठी)

- दैनंदिन ठेव खात्यावर 3% दराने (On daily product basis) व्याज आकारणी करण्यात येईल. खात्याची मुदत संपताना व्याज अदा करण्यात येईल. ठेवीदाराने खाते उघडल्यापासून पहिल्या सहा महिन्याच्या आत खाते मुदतपूर्व बंद केले, तर त्यावर कोणतेही व्याज देय राहणार नाही. उलट एकूण जमा रकमेवर 4% रक्कम दंडस्वरूप कपात करण्यात येईल. ठेवीदाराने खाते उघडल्यापासून सहा महिन्यानंतर, परंतु मुदत संपण्यापूर्वी खाते मुदतपूर्व बंद केले, तर 6 महिन्यानंतर जमा रकमेवर विना दंड व विना व्याज शिल्लक रक्कम अदा करता येईल. ठेवीदाराला खात्याची मुदत संपण्यापूर्वी मुदतपूर्व खाते बंद करण्याऐवजी जमा शिल्लक रकमेवर 80% पर्यंत रक्कम कर्ज घेता येईल. या रकमेवर 10% व्याज आकारण्यात येईल. खात्याची मुदत संपल्यानंतर ठेव खात्याची व्याजासह संपूर्ण रक्कम कर्ज खाती जमा करून संबधित कर्ज खाते बंद करून घेण्यात येईल.

- या दैनंदिन ठेव खात्याची मासिक रक्कम कॅश क्रेडिट खाती जमा करण्यास अनुमती राहणार नाही. तथापि अशी मासिक रक्कम सोने तारण व ठेव तारण कर्जासह कोणत्याही मुदत कर्ज खाती जमा करण्यास अनुमती राहील. यासाठी बँक स्थायी सूचना (Standing Instruction) स्वीकारेल. या प्रकारे रक्कम वर्ग करताना दैनंदिन ठेव खाती किमान शिल्लक रु.100 राखणे बंधनकारक राहील. मात्र कर्जदाराला याप्रकारे रक्कम वर्ग करण्याच्या सेवेसाठी वर्ग केलेल्या रकमेच्या 1.50% प्रभार नावे टाकण्यात येतील.

S J S B

- पिग्मी एजंटमार्फतच जमा पात्र दैनंदिन ठेव रककमेवर पिग्मी एजंट यांना वेळोवेळी संचालक मंडळामार्फत थरविलयाप्रमेणे कमिशन दिले जाईल . दैनंदिन ठेव खाते बाबत व्याजदर व पिग्मी एजंट यांचे नेमणूक व कमिशन मध्ये वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार संचालक मंडळास असतील.

५) **निरक्षर व्यक्तीचे खाते:-** निरक्षर व्यक्तीस बँकेत सेव्हिंग खाते व मुदत ठेव खाते उघडता येईल. खाते उघडताना सही ऐवजी डाव्या/उजव्या हाताचा निशाणी अंगठा/दस्तूरव बँकेस मान्य असलेल्या व्यक्तीची ओळख देवून आणि **KYC** नियमानुसार ओळखपत्र व अॅड्रेस प्रूफसाठी मान्य कागदपत्रे देऊन खाते उघडता येईल. हाताचा निशाणी अंगठा बँकेच्या अधिकाऱ्यासमक्ष खाते उघडण्याच्या फॉर्मवर व सही नमुना कार्डवर उमटवावा लागेल. त्याच प्रमाणे खाते उघडतेवेळी ओळख देणाऱ्या व्यक्तीस देखील खातेदारासामावेत समक्ष बँकेत यावे लागेल खात्यास चेक बुक देण्यात येणार नाही. रक्कम काढण्यासाठी खातेदारास समक्ष बँकेत यावे लागेल. बँकेचे अधिकारी निरक्षर खातेदारास खात्यावर व्यवहार करताना सावधगिरी बाळगण्याविषयी मार्गदर्शन करतील.

निरक्षर व्यक्तीचे चालू खाते उघडून घेण्याविषयी बँकेचे अधिकारी परिस्थिती पाहून त्या त्या वेळी निर्णय घेतील. निरक्षर व्यक्तीचे अन्य साक्षर व्यक्तीबरोबर संयुक्तखाते शक्यतो उघडण्यात येउ नये .कारण त्यात निरक्षर व्यक्तीची फसवणूक होण्याची शक्यता असते.तथापि, अपवादात्मक प्रसंगी पती-पत्नी किंवा जवळचे नातेवाईक यांच्या नावाने संयुक्त खाते उघडता येईल. मात्र खाते उघडतेवेळी बँकेचे अधिकारी संबंधित व्यक्तीस सावधगिरी बाळगण्याच्या सूचना देतील.

SOLAPUR JANATA SAH BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK SOLAPUR

निरक्षर व्यक्तीने योग्य व कायदेशीर पॉवर ऑफ अॅटर्नी दिल्यास अॅटर्नी द्वारे खाते चालविण्याची परवानगी राहील.

६) अंध व्यक्तीचे खाते:-

१) अंध व्यक्तीस देखील खाते उघडण्याच्या **KYC** नियमानुसार सर्व प्रक्रिया पूर्ण करूनसेव्हिंग्ज व मुदत ठेव खाते उघडता येईल. अशा व्यक्तीची फसवणूक होऊ नये म्हणून बँकेचे अधिकारी त्यास खात्यावर व्यवहार करताना सावधगिरी बाळगण्याच्या आवश्यक सूचना देतील व मार्गदर्शन करतील.

२) अंध व्यक्तीचे संयुक्त खाते शक्यतो उघडण्यात येऊ नये. अपवादात्मक प्रसंगी पती-पत्नी किंवा जवळचे नातेवाईक यांच्या नावाने संयुक्त खाते उभयतांना सावधगिरीच्या सूचना देवून उघडण्यास हरकत नाही.

७) अज्ञानाचे ठेव खाते:-

अ) अज्ञानाच्या नावाने सेव्हिंग्ज खाते उघडता येईल. तसेच अज्ञानाच्या नावाने मुदत ठेवीत गुंतवणूक करता येईल. अज्ञानाच्या नावावरील सेव्हिंग्ज खात्यावर अज्ञानाच्या वतीने पालनकर्ते म्हणून त्याचे नैसर्गिक आई/वडील किंवा कोर्टाने नेमून दिलेले गार्डियन यांना व्यवहार करता येईल.

विशेष बाब म्हणून 10 वर्षावरील व सही करता येणाऱ्या मुलास/मुलीस स्वतःच्या नावाने सेव्हिंग/रिकरिंग खाते उघडता येईल.अशा सेव्हिंग्ज खात्यास दि. 21/04/2025 चे RBI सर्क्युलर क्र. RBI/2025-26/26, DOR.MCS.REC.17/01.01.003/2025-26 प्रमाणे जोखीम व्यवस्थापन आणि ग्राहकांच्या योग्यतेच्या धोरणावर आधारित चेकबुक/एटीएम कार्ड देता येईल या शिवाय या खात्यावर रिझर्व्ह बँकेच्या सुचनेनुसार व्यवहार व शिल्लकीवर मर्यादा असणार आहेत. अज्ञानाच्या नावावर संयुक्त खाते देखील उघडता येईल. याच बरोबर वयाचा/जन्म दिनांकाचा ग्राह्य पुरावा सदर करावा लागेल.

ब) अज्ञान खातेदार सज्ञान झाल्यास (वयाची 18 वर्षे पूर्ण केल्यावर) खाते चालविण्याचे अधिकार त्यास आपोआप प्राप्त होतील. त्यासाठी त्याच्या स्वाक्षरीचा नमुना बँकेकडे देणे आवश्यक राहील. अज्ञानाचे खाते त्याचे वतीने पालनकर्ते चालवीत असतील तर अशा अज्ञान खातेदारास तो सज्ञान झाल्यावर,त्याच्या खात्यावरील शिल्लक रक्कम बरोबर असून त्यास मान्य असल्याबाबतचे पत्र स्वतःच्या सहीने बँकेस द्यावे लागेल.

८) संयुक्त खाते (Joint Accounts) :

एका पेक्षा अधिक व्यक्तींना, परंतु जास्तीत जास्त चार व्यक्तींच्या नावाने संयुक्तपणे कोणतेही ठेव खाते उघडता येईल. त्यापेक्षा अधिक व्यक्ती असतील तर मुख्य कार्यालयाची पूर्व परवानगी आवश्यक राहील. KYC नियमाप्रमाणे प्रत्येक खातेदाराची स्वतंत्र ओळख पटविणारी कागदपत्रे उदा: कायदेशीर ओळखपत्र व अॅड्रेस प्रूफसाठी मान्य कागदपत्रे देणे आवश्यक राहील.

a) संयुक्त नावावर (बिगर संस्था) सेव्हिंग्ज किंवा चालू ठेव खाते उघडताना खात्यावर व्यवहार करणे संदर्भातील स्पष्ट लेखी सूचना खाते उघडतेवेळी संबंधित सर्व खातेदारांनी देणे आवश्यक आहे. सदरच्या सूचना मागाहून देखील बदलता येतील, मात्र त्याकरिता सर्व खातेदारांची लेखी संमती आवश्यक राहील. संयुक्त खातेदारापैकी कोणीही मयत झाल्यास खात्यावरील व्यवहार स्थगित ठेवण्यात येतील. अशा खात्यातील शिल्लक रक्कम क्लेम करण्यासाठी बँकेच्या प्रचलित नियमाप्रमाणे संबंधित लाभार्थींनी बँकेकडे रीतसर अर्ज

SJSB
SOLAPUR JANATA SAH BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK SOLAPUR

केल्यानंतर बँकेच्या निर्णयानंतर खात्यातील रक्कम संबंधितांना देण्यात येईल. (केवळ सेव्हिंग्ज व चालू ठेव खात्याबाबतीत)

b) संयुक्त खात्याच्या बाबतीत, बँक सर्व संबंधित खातेदारांच्या लेखी विनंतीवरून खात्यावर नवीन खातेधारकाच्या नावाचा समावेश करणे/आधीच्या खातेधारकाचे नाव कमी करणे यासाठी परिस्थितीनुसार परवनागी देईल. व्यक्तिगत ठेवीदाराच्या लेखी विनंतीवरून मागाहून नवीन खातेधाराकाचे नाव संयुक्त खातेदार म्हणून समाविष्ट करून घेईल.

c) संयुक्त नावाने असलेल्या मुदत ठेवींच्या **(Term Deposits)** खात्याच्या बाबतीत संबधित खातेदार खात्यातील शिल्लक मुदतीनंतर कोणास मिळावी यासंदर्भातील सूचना खालील प्रमाणे देवू शकतात.

1) **Either or Survivor -**(कोणासही किंवा जो हयात आहे त्यास): यामध्ये ठेव खात्यातील शिल्लक रक्कम व व्याज लागू झाल्यास व्याजासह, कोणत्याही खातेदारास किंवा खातेदारापैकी कोणी मरण पावल्यास जो हयात असेल त्यास दिली जाईल. मात्र ठेव मुदतपूर्व परत हवी असल्यास अथवा ठेवीच्या तारणावर कर्ज हवे असल्यास, सर्व ठेवीदारांच्या संमतीदर्शक सह्या विहित कागदपत्रावर लागतील.

2) **Former or Survivor-**(प्रथम खातेदारास किंवा जो हयात राहील त्यास) यामध्ये संयुक्त खात्यावर प्रथम नाव असलेल्या **(Former)**खातेदारास तो हयात असेल तर त्यासच शिल्लक रक्कम व व्याज लागू झाल्यास व्याजासह रक्कम दिली जाईल. प्रथम नाव असलेला खातेदार मरण पावल्यास हयात असलेल्या **(Survivor)** खातेदारास रक्कम दिली जाईल. सदरची तरतूद प्रथम खातेदाराचे निधन झाल्या नंतरच अंमलात येईल.

यात दोन पेक्षा जास्त खातेदार संयुक्तपणे खाते उघडत असतील तर त्यांनी एकतर स्वतंत्र सूचना देवून जर एखादा खातेदार मयत झाला तर उर्वरित खातेदारापैकी कोणाही एकास व्यवहार करता येतील. अशी स्पष्ट सूचना द्यावी लागेल. अशी सूचना न दिलेस अशा प्रसंगी ते खाते उर्वरित खातेदाराचे संयुक्त सहीने वापरणे बंधनकारक राहील. यावेळी बँकेचा निर्णय अंतिम राहील.

3) **Anyone or Survivor-**(कोणीही किंवा हयात असलेले) मुदत ठेव खाते जर दोन पेक्ष्या अधिक व्यक्तींच्या संयुक्त नावाने असेल उदा: अ, ब. क. तर अशा वेळी ठेवीची रक्कम व व्याज लागू होत असल्यास व्याजासह रक्कम, ठेवीची मुदत संपल्यानंतर ठेवीचे पेमेंट ज्या दिवशी केले जाईल त्या तारखेस, जर सर्व खातेदार हयात असतील तर कोणाही एका खातेदारास देता येईल. मात्र त्यावेळी एक किंवा त्याहून अधिक खातेदार जर मयत झालेले असतील तर अशावेळी हयात असलेल्या कोणत्याही खातेदारास रक्कम देण्यात येईल. या बाबतीतच्या योग्य त्या सूचना खाते उघडतेवेळीच सर्व खातेदारांनी लेखी स्वरुपात बँकेकडे देणे आवश्यक राहील. मात्र ठेव मुदतपूर्व परत हवी असल्यास अथवा ठेवीच्या तारणावर कर्ज हवे असल्यास, सर्व ठेवीदारांच्या संमतीदर्शक सह्या विहित कागदपत्रावर लागतील.

९) वारस नेमण्याची सुविधा (Appointing Nominee)

1) सेव्हिंग्ज व मुदत ठेव खात्यांच्या बाबतीत, आणि प्रोप्रायटरी फर्मचे चालू खात्याच्या बाबतीत खातेदारास आपल्या मर्जीनुसार कोणासही वारस **(Nominee)** म्हणून नेमण्याची

SOLAPUR JANATA SAH BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK

कायदेशीर सुविधा उपलब्ध आहे. नॉमिनी म्हणून एकाच व्यक्तीस नेमता येईल. केंद्र सरकारने 2024 च्या बँकिंग कायद्यांमध्ये सुधारणा करण्याच्या कायद्याला मंजुरी दिली आहे, ज्यामुळे बँक खात्यांच्या धारकांना एकाऐवजी जास्तीत जास्त चार व्यक्तींची नियुक्ती करता येईल. **चार नॉमिनी बद्दल अजून रिझर्व बँकेचे सर्क्युलर नसल्याने त्याबाबत भाष्य करता येणार नाही.** बँकेचे अधिकारी खाते उघडतांना खातेदारास नॉमिनी नेमण्याचा आग्रह करतील. अज्ञानास नॉमिनी म्हणून नेमता येईल. मात्र ज्या खातेदारांना नॉमिनी नेमून देण्याची इच्छा नसेल, त्यांनी तसे लेखी बँकेस कळविणे आवश्यक राहील.

2) ज्या ठेव खात्यास नॉमिनी नेमून दिलेला असेल, अशा बाबतील खातेदाराचे निधन झाल्यास खात्यावरील शिल्लक रक्कम, व्याज लागू झाल्यास व्याजासह, खातेदाराच्या कायदेशीर वारसांच्या वतीने विश्वस्त म्हणून खातेदाराने आपल्या हयातीत नेमलेल्या नॉमिनीस देण्यात येईल.

3) खातेदारास आपल्या हयातीत केंव्हाही लेखी सूचना देवून नॉमिनी रद्द करता येईल वा बदलून दुसरा नॉमिनी देता येईल.

१०) वारस नोंद असताना मुळ डीपॉझीटर मयत झाल्यास वारसास करावयाच्या पूर्तता :

१) वारसाने एक अर्ज करणेचा

२) त्यासोबत डीपॉझीटर मयत झालेचा मयत दाखला अस्सल प्रत देणेची.

३) वारसाचे गरजेनुसार सदर खाते सेव्हींग असलेस ते खाते बंद करून नवे खाते उघडले जाईल. संगणक प्रणालीत तेच खाते पुढे चालू ठेवणेची सोय नसलेने नवे खाते उघडणेचे. जर जुन्या अकौंट चा नंबर समजा "गॅस"सबसिडी " इ.सी.एस." स्टॅन्डिंग इन्स्ट्रक्शनअशा काही व्यवहारासाठी तर असे सर्व व्यवहार नवीन अकौंटला बदलून घेणेची जबाबदारी अशा नॉमिनीची राहील.

४) नॉमीनी म्हणून पूर्तता करीत असतानाच अन्य वारसांची हरकत आल्यास ती हरकत एकतर नॉमिनीने दूर करून देणेची आहे. अन्यथा मे. सक्षम कोर्ट यांचेकडून सक्सेशन सर्टिफिकेट आणणे आवश्यक राहील व त्यानुसारच निर्णय होईल.

५) यानुसार शाखाधिकारी यांचे अधिकारात हा बदल करणेचा आहे.

११) व्याज आकारणी:-

सेव्हिंग्ज ठेव खात्यावरील व्याज आकारणीबाबत रिझर्व्ह बँकेच्या त्या संदर्भातील मार्गदर्शक सुचनांनुसार व रिझर्व्ह बँक वेळोवेळी ठरवेल त्या दराने व्याज देण्यात येईल. सध्या दैनिक पद्धतीने व्याजाची आकडेमोड विचारात घेवून दर सहामहीस व्याज देणेचे. सध्या व्याजदर द.सा.द.शे. 2.75 % राहील. अशी व्याज **आकारणी दर तिमाही 30 जून, 30 सप्टेंबर, 31 डिसेंबर व 31 मार्च अशी करण्याची आहे**

a) सर्व प्रकारच्या मुदतबंद ठेवीचे **(Term Deposits)**व्याजदर ठरविण्याचे अधिकार रिझर्व्ह बँकेने बँकेस दिले असल्याने त्यानुसार बँकेचे संचालक मंडळ वेळोवेळी मुदतनिहाय व्याज दर ठरवेल. व्याज आकारणी रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व बँकेच्या योजनेनुसार करण्यात येईल. तसेच रिझर्व्ह बँकेच्या ठेवीवरील व्याजदरासंबंधीच्या मास्टर सर्क्युलर तसेच रिझर्व्ह बँकेच्या दि. 01/01/2024 च्या सर्क्युलर क्र . RBI/2023-24/104 DoR.SPE.REC.63/13.03.00/2023-2024 नुसार रु.100 लक्ष व त्यापेक्षा जास्त रक्कमेचे ठेवीस "बल्क डीपॉझीट" असे समजले

SOLAPUR JANATA SAH BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK SOLAPUR

जाईल. यावर त्याच मार्गदर्शक सुचनेनुसार पावतीच्या व्याजदरामध्ये तफावत (DISCRIMINATE) ठेवणेचा/देणेचा अधिकार मा.उपसरव्यवस्थापक, मा.सरव्यवस्थापक आणि मा. व्यवस्थापकीय संचालक यापैकी कोणाही दोघास संयुक्तपणे राहतील व या संदर्भामध्ये व्याजदर वेळोवेळी ठरवतेवेळी विषद केले जाईल . **तसेच ज्यावेळी काही खातेदारांना प्रचलित व्याजदरापेक्षा अधिक व्याजदर देण्याचा असेल तेव्हा तो विभागप्रमुखानी उपसरव्यवस्थापक/ व्यवस्थापक/ मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/ मा.अध्यक्ष/मा.संचालक मंडळ यांची मान्यता अथवा कार्योत्तर मान्यता घेऊन देण्यात येईल.**

b) ठेविदारास दरमहा व्याज हवे असेल तर अशा बाबतीत व्याजाची आकारणी तिमाही करण्यात येऊन त्याची विभागणी, इंडियन बँक असोसिएशनने मान्य केलेल्या प्रचलित गणितीय सूत्राच्या आधारे डिस्काऊंट पद्धतीने करण्यात येऊन दरमहा व्याज दिले जाईल.

c) बँकेच्या सर्व शाखांतून व्याजदर ठळकपणे दर्शविण्यात येतील. बँकेने ठेवीचे व्याजदर, ठेव योजना व अन्य तदनुषंगिक कांही बदल केल्यास शाखांतून ताबडतोब त्याची माहिती ठळकपणे दर्शिविण्यात येईल. याच बरोबर बँकेच्या sjsbbank.com या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेत येईल.

d) प्रचलित आयकर कायद्यानुसार ठेवीदारांना त्यांच्या ठेवीवरील देय व्याजावर आयकर कपात (TDS) केला जाणार आहे.

e) ठेवीच्या प्रत्येक खातेदार यांनी पॅन कार्ड देणे आवश्यक आहे व सदर पॅन कार्ड आधार कार्ड शी लिंक केलेले असले पाहिजे , ज्यांचेकडे पॅन क्रमांक नसेल त्यांनी उत्पन्न शेती अथवा इतर व्यवसायाचे असेल तरी अर्ज क्रमांक 60 (नवीन नमुना) भरून देणे आवश्यक आहे.

f) ज्या खातेदारांनी पॅन क्रमांक दिला नसेल अथवा दिलेले पॅन कार्ड आधार कर्दशी लिंक कलेले नसल्यास त्यांच्या कपात पात्र व्याज रकमेतून प्रचलित कायद्यातील तरतुदीनुसार टी.डी.एस. कपात केली जाईल. सध्या अशी कपात २० % आहे.

g) व्याजाच्या रकमेतून आयकर कापल्यास त्याबबातचे प्रमाणपत्र **(TDS Certificate)**बँक ठेविदारास देईल. ठेविदारास अशा कर कपातीपासून सूट मिळविण्याचा हक्क असून त्याबाबतचे आयकर कायद्यानुसारचे विहित नमुन्यातील घोषणापत्र ठेवीदाराने आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस बँकेस देणे आवश्यक आहे.

h) डी.इ.ए.एफ. (Depositor Education and Awareness Fund) या रिझर्व्ह बँकेकडील फंडास वर्ग झालेल्या 10 वर्षे व त्यापेक्षा जास्त मुदती च्या कोणत्याही ठेवीस रिझर्व्ह बँकेच्या प्रचलित दराने व्याज आकारणी केली जाईल.

i) अप्रेंटिस, प्रोबेशनरी किंवा कंत्राटी कर्मचाच्या विनंतीनुसार, त्यांच्या बँकेच्या सेवा कालावधीत त्यांच्या मुदत ठेवीवर 1% अतिरिक्त व्याज दर उपलब्ध असेल, परंतु जर अप्रेंटिस, प्रोबेशनरी आणि कंत्राटी कर्मचार्यांची सेवा कोणत्याही कारणास्तव संपुष्टात आली असेल (कराराचा कालावधी संपल्यामुळे किंवा कराराच्या कालावधीपूर्वी) किंवा काही कारणास्तव त्याच्या/तिच्या सेवेत व्यत्यय आला असेल तर अशा कर्मचार्यांना त्यांच्या सेवा कालावधीनंतर उपलब्ध असलेल्या अतिरिक्त व्याज दर सवलती अशा अप्रेंटिस, प्रोबेशनरी किंवा कंत्राटी कर्मचार्यांना उपलब्ध होणार नाहीत, सध्याचा 1% अतिरिक्त व्याज दर त्यांच्या चालू मुदत ठेवीची मुदत संपेपर्यंत लागू असेल. त्यानंतरचे नूतनीकरण आणि नवीन ठेवी 1% अतिरिक्त व्याज दराने स्वीकारल्या जाणार नाहीत.

SOLAPUR JANATA SAH BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK SOLAPUR

j) ज्या कर्मचाऱ्यांचा नियमित सेवा कार्यकाळ पूर्ण झाला आहे (सध्याच्या नियमांनुसार 55 किंवा 58 वर्षे) आणि बँकेच्या नियमांनुसार निवृत्त झाले आहेत, असे सेवानिवृत्त कर्मचारी अतिरिक्त 1% व्याज दरासाठी पात्र असतील. याचा अर्थ असा आहे की ही सवलत कोणत्याही कारणास्तव कर्मचार्यांना उपलब्ध होणार नाही, जे हे निकष पूर्ण करत नाहीत. तसेच, जे कर्मचारी 55 ते 58 वर्षे वयोगटातून 1 किंवा 2 मुदतवाढ घेऊन निवृत्त झाले आहेत किंवा ज्यांनी 20 वर्षे पूर्ण झाल्यानंतर सेवेतून राजीनामा दिला आहे, ते कर्मचारी त्यांच्या ठेवींवर अतिरिक्त 1% व्याज दर मिळवण्यास पात्र आहेत.

k) स्टाफ सोसायटी/वेल्फेअर असोसिएशन ऑफ स्टाफ देखील 1% अतिरिक्त व्याज दरासाठी पात्र आहेत.

l) बँकेचे माजी कर्मचारी तसेच वरिष्ठ नागरिक जे बँकेच्या कायमस्वरूपी सेवेतून निवृत्त झाले आहेत (वयोमर्यादा 58/60 वर्षे पूर्ण) ज्येष्ठ नागरिक आणि बँक कर्मचार्यांना अशा दोन्ही व्याज दर सवलती एकत्रितपणे विचारात घेऊन व्याज दर दिले जातात, असा नियम आहे की सामान्य ठेवींवर लागू असलेल्या व्याज दरापेक्षा 1.50% जास्त व्याज दर दिले जाऊ शकतात. या नियमातील सवलती/बदल स्वीकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार माननीय संचालक मंडळाकडे राहील.

m) बँकेच्या मृत (वर्तमान/माजी) कर्मचाऱ्यांच्या जोडीदाराला 1% अतिरिक्त व्याज दर दिला जाईल. परंतु मृत व्यक्तीच्या जोडीदाराला 1% अतिरिक्त व्याज दर देताना, अशा ठेवीमध्ये जमा केलेली रक्कम मृत कर्मचाऱ्यांची असल्याची घोषणा नोंदवली जावी.

n) कोणतीही व्यक्ती किंवा संस्था (E.g., ज्येष्ठ नागरिक, वर्तमान कर्मचारी/माजी कर्मचारी) एकाच वेळी दोन व्याजदरांचा लाभ घेऊ शकत नाही.

SJSB

१२) मुदत संपलेल्या ठेवी (Overdue Deposits) :

क) मुदत संपून गेल्यास ठेवीचे As on date पद्धतीने नुतनीकरण होणार नाही. अशी ठेव खातेदार परत मागत असेल तर त्यास फक्त मुदत संपलेल्या तारखेपर्यंत देय असलेले व्याज मिळेल.

ख) **सर्व खात्यांसाठी स्वयंचलित नूतनीकरण अनिवार्य असेल.** मात्र खातेदार खाते उघडताना मुदतीनंतर ठेव परत करणेविषयी अथवा ठेवीची आपोआप पुनर्गुंतवणूक करणेविषयी आगाऊ सूचना देवू शकतात व त्यानुसार बँक कार्यवाही करेल.

ग) खातेदारांना ठेव ठेवतेवेळी त्या ठेवीच्या मुदतीअंती आपोआप नूतनीकरण करणेची सुविधा सुरुवातीसच करून दिली जाईल. त्यानुसार त्याच मुदतीने व मुदत संपते दिनांक रोजी त्या मुदतीस लागू असणा-या व्याजदराने संगणकावर आपोआप नूतनीकरण होईल. याचे नियम संचालक मंडळ वेळोवेळी ठरवेल ते खातेदारावर बंधनकारक राहतील. यात क्युम्युलेटिव्ह ठेवीबाबत ग्राहक सुरुवातीसच सूचना देऊ शकतील.

i) फक्त मुद्दल रिन्यू करण्याची व व्याज सेव्हिंग खात्यास किंवा पे ओर्डर ने देणेची सुचना देवून करू शकतील . यावेळी नियमाप्रमाणे TDS देय असल्यास वजा केला जाईल.

ii) खातेदार अशा ठेवी व्याजासह आपोआप नूतनीकरण करण्याची सूचना देवू शकतील तथापि TDS कायद्यनुसार TDS कपात होईल व तेवढी मुदतीअंती देय रक्कमेतून देय TDS वजा करून ठेव खाते रिन्यू होईल. मात्र अशा दोन्ही वेळी ज्या खातेदारास 15 G व 15 H नमुन्याचे द्यायचे डिक्लेरेशन देवून tds कपात बंद होईल. अशी डिक्लेरेशन एप्रिलमध्ये किंवा ठेव ठेवते

वेळी देणेची आहे. मात्र अशा ठेवीवर कर्ज काढले असल्यास कर्ज व ठेव दोन्ही खाती आपोआप रिन्यू होतील यात बदल हवा असल्यास तीन दिवस अगोदर लेखी कल्पना संबंधित शाखेत देणेची आहे.

१३) **मुदतपूर्व ठेव अदा करणे बाबत :-**ठेवीची रक्कम ठेवीदाराच्या विनंतीवरून मुदत संपण्याचे आत (Premature Withdrawal) परत करण्याचे अधिकार बँक राखून ठेवीत आहे. ठेव मुदतपूर्व हवी असल्यास त्यासाठी ठेवखात्यावर नाव असलेल्या सर्व ठेवीदारांची लेखी संमती आवश्यक राहील. अशा प्रसंगी 1% दंड व्याज आकारून ठेविदारास मुदत पूर्व ठेव परत करणे आणि दंड व्याजाचा दर ठरविणे इत्यादी बाबत बँक वेळोवेळी निर्णय घेईल.

१४) **ठेवीची मुदतपूर्व पुनर्गुंतवणूक करणे:-**आधीची ठेव मुदतपूर्व मोडून रकमेची पुनर्गुंतवणूक करण्याची खातेदाराची विनंती खालील अटीनुसार मान्य करता येईल.

a) नुतनीकरण होणाऱ्या ठेवीची मुदत आधीच्या मूळ ठेवीच्या शिल्लक राहिलेल्या (Balance Period) मुदतीपेक्षा जास्त असली पाहिजे.

b) अशावेळी, आधीची ठेव मुदतपूर्व मोडताना, ठेव ठेवलेल्या दिवसापासून ते नुतनीकरण होणाऱ्या तारखेपर्यंत झालेल्या कालावधीस जो व्याज दर, ठेव ठेवलेल्या दिवशी प्रचलित असेल, त्या व्याजदरापेक्षा 1% कमी व्याजदराने झालेल्या कालावधीसाठी व्याज देण्यात येईल.

१५) **ठेवीच्या तारणावर कर्ज देणे:** ठेविदारास प्रसंगोपात ठेवीच्या तारणावर मुदत कर्ज (Term Loan) किंवा ओव्हरड्राफ्ट कर्ज, ठेवीदाराच्या विनंतीवरून देण्याबाबत बँक विचार करेल. त्यासाठी ठेवीदाराने ठेव पावती रीतसर डिस्चार्ज करून व बँकेच्या नियमानुसार कर्ज विषयक कागदपत्रे/दस्त लिहून, सही करून देणे आवश्यक राहेल. तसेच, अज्ञानाच्या नावाने असलेल्या ठेवीच्या तारणावर देखील योग्य त्या हमीपत्राच्या आधारे अज्ञानाच्या कल्याणासाठी पालकास तारण कर्ज देता येईल. ठेवीच्या प्रमाणात कर्जाची रक्कम निश्चित करणे व व्याज दर याबाबत बँक वेळोवेळी निर्णय घेईल. संयुक्त ठेवीच्या बाबतील ठेव तारण कर्जासाठी सर्व संबंधित ठेवीदारांची लेखी संमती आवश्यक राहील. थर्ड पार्टी ठेवीच्या तारणावर बँक ठरवेल त्या नियमांनुसार व व्याजदराने कर्ज देण्यात येईल. विविध व्याजदराच्या ठेव पावत्या कर्जासाठी तारण दिल्या असल्यास जास्तीत जास्त व्याजदर असलेल्या ठेवीपेक्षा 2 % अधिक दराने व्याज आकारले जाईल आणि थर्ड पार्टीसाठी हाच व्याजदर 3 % राहील. कर्जाची रक्कम रु.15 लाख व त्यापेक्षा अधिक असेल तर तारण कर्जास विशेष सवलतीचा व्याजदर ठरविण्याचा अधिकार व्यवस्थापकीय संचालक अथवा सरव्यव्स्थापक अथवा उप सरव्यवस्थापक कर्जे यांना कोणाही एकास राहील.

१६) **मयत ठेवीदाराची रक्कम वारसास आदा करणेबाबत:-**

याबाबत स्वतंत्र पॉलीसी असून कायदे, कानून, अधिनियम, पोटनियम यातील तरतुदीसह सदर पॉलीसीतील नमूद धोरणानुसार कार्यवाही केली जाईल.

१७) **मयत ठेवीदाराच्या ठेवीवर व्याज देणे बाबत:-**

याबाबत स्वतंत्र पॉलीसी असून कायदे, कानून, अधिनियम, पोटनियम यातील तरतुदीसह सदर पॉलीसीतील नमूद धोरणानुसार कार्यवाही केली जाईल.

१८)**ठेव विमा संरक्षण (Deposit Insurance Cover)**

SJSB

SOLAPUR JANATA SAH BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK SOLAPUR

बँकेकडील सर्व ठेवींचा विमा **डिपॉझिट इन्श्युरन्स अॅन्ड क्रेडीट गॅरंटी कॉर्पोरेशन** या संस्थेच्या ठेव विमा योजनेच्या नियमा अंतर्गत व त्यांच्या शर्ती व अटीनुसार उतरविण्यात येईल. बँकेच्या सर्व शाखेत या बाबतीतची माहिती खातेदारासाठी उपलब्ध असेल.

१९) **गोपनीयता:** बँकेकडे असलेल्या खातेदाराच्या माहितीबाबत बँक पूर्ण गोपनीयता पाळेल व खातेदाराच्या लेखी अनुमती शिवाय कोणतीही माहिती अन्य कोणासही बँक देणार नाही. तथापि अशी माहिती देणे ज्यावेळी कायद्याने बँकेवर बंधनकारक होईल, किंवा सार्वजनिक हितासाठी वा बँकेच्या हितासाठी अशी माहिती उघड करणे आवश्यक असेल, तर अशावेळी बँक सदरची माहिती संबधित शासकीय विभाग, शासनाने अधिकृत केलेली व्यक्ती किंवा अन्य संस्था/व्यक्ती यांना देईल.

२०) ग्राहकसेवा :-

a) सेव्हींग्ज ठेव व आवर्तक ठेव खातेदारास पास बुक देण्यात येईल व त्यामध्ये खात्यामधील व्यवहाराची नोंद करण्यात येईल. खातेदाराने त्यासाठी पास बुक वेळोवेळी बँकेत/शाखेत आणून देणे आवशक आहे. चालू ठेव खातेदारास खाते उतारा प्रत्येक महिन्याच्या ५ तारखे पर्यंत देण्यात येईल.

b) मुदतठेव खातेदारास ठेव पावती (Fixed Deposit Receipt) देण्यात येईल. त्यामध्ये ठेविदाराचे नाव, संयुक्त ठेव असल्यास सर्व ठेवीदारांची नावे, ठेव प्रकार, गुंतविलेली रक्कम, ठेवीची मुदत, मुदत संपणारी तारीख, (Expiry Date) व्याजदर आणि/किंवा मुदतीनंतर देय होणारी व्याजासह एकवट रक्कम (Payable Amount), वारस नोंद असल्यास त्याचा उल्लेख इ. तपशील ठेव पावतीवर देण्यात येईल.

c) आजारी खातेधारक किंवा रुग्णालयात उपचार घेत असलेले खातेधारक किंवा वृद्धापकाळामुळे बँकेत येऊन पैसे काढू न शकणारे खातेधारक, या ग्राहकांसाठी, शाखेचा कर्मचारी संबंधित खातेधारकांकडे पैसे काढण्याच्या स्लिप/चेकवर स्वाक्षरी करून संबंधित खातेधारकाच्या नातेवाईकांना रक्कम सोपवतो. जर खातेधारक अशा वेळी स्वाक्षरी करू शकत नसेल, तर पैसे काढण्याच्या स्लिप/धनादेशाच्या मागे डॉक्टरांची स्वाक्षरी घेतली जाईल किंवा खातेधारकांकडून स्वतंत्रपणे वैद्यकीय प्रमाणपत्र घेऊन पैसे काढले जातील. व्यवहाराच्या वेळी बँकेचा एक जबाबदार कर्मचारी/अधिकारी उपस्थित असेल. अशा कर्मचाऱ्यांनी त्यावेळी उपस्थित राहून परिस्थिती पाहिली पाहिजे आणि त्यानुसार कारवाई केली पाहिजे.

d) त्यानुसार, जे खातेधारक आजारपणामुळे स्वाक्षरी करू शकत नाहीत, म्हातारपणामुळे बँकेत येऊ शकत नाहीत किंवा आजारपणामुळे रुग्णालयात दाखल होऊ शकत नाहीत, अशा खातेधारकांकडून किंवा त्यांच्या नातेवाईकांकडून खातेधारकांकडे असलेल्या रकमेसाठी शाखांकडे मागणी केली जाते. खातेधारकांकडून स्वाक्षऱ्या घेताना दोन साक्षीदारांची आवश्यकता असते. साक्षीदारांपैकी एक साक्षीदार बँकेचा जबाबदार बँक अधिकारी असावा. तथापि, जेव्हा खातेधारक पैसे काढण्याच्या स्लिप/चेकवर स्वाक्षरी/अंगठा करू शकत नाही, अशा वेळी जेव्हा खातेधारक बँकेत येऊ शकत नाहीत, अशा परिस्थितीत बँकेच्या जबाबदार अधिकाऱ्याला खातेधारकांकडे जाऊन पैसे काढण्याच्या स्लिप/चेकवर एक ठसा उमटवावा लागतो. हे चिन्ह कोणत्याही प्रकारे चालू ठेवण्यास सक्षम असेल. पण तरीही, खातेधारकांकडून मार्क घेण्यासाठी दोन साक्षीदारांची आवश्यकता असते. साक्षीदारांपैकी एक साक्षीदार बँकेचा जबाबदार बँक अधिकारी असला पाहिजे.

e) वर नमूद केल्याप्रमाणे , खातेधारकाच्या खात्यातील रक्कम नक्की कोणाला दिली जावी, हे बँक अधिकाऱ्याकडून खातेधारकाला विचारणे आवश्यक आहे. त्यानुसार, त्या व्यक्तीची ओळख पूर्ण केल्यानंतर पैसे काढण्याच्या स्लिप/धनादेशाच्या मागील बाजूस त्या व्यक्तीची स्वाक्षरी

SOLAPUR JANATA SAH BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK SOLAPUR

घेतली पाहिजे. या कारवाईसाठी 2 साक्षीदारांचीही आवश्यकता आहे. साक्षीदारांपैकी एक साक्षीदार बँकेचा जबाबदार बँक अधिकारी असला पाहिजे.

f) दोन्ही हात नसल्यामुळे स्वाक्षरी करू न शकणाऱ्या ग्राहकांव्यतिरिक्त, या संदर्भात रिझर्व्ह बँकेने त्यांच्या परिपत्रक RPCD.No.RF.BC.71/07.38.01/98-99 मध्ये अशा व्यक्तींची खाती उघडण्याबाबत मार्गदर्शन केले आहे. त्यानुसार, अशा व्यक्तीने कोणत्याही प्रकारे केलेले चिन्ह (उदा., पायाची बोटे किंवा टाच किंवा शरीराच्या कोणत्याही भागाचे चिन्ह) त्याच्या/तिच्या स्वाक्षरीवर उपचार केले पाहिजेत. तथापि, अपंग व्यक्तीने पैसे काढण्याच्या स्लिपवर कोणतेही चिन्ह करणे आवश्यक आणि अनिवार्य आहे.

२१)अन्य नागरी सहकारी बँकेकडून ठेव स्वीकारणे.

आपण FSWM (Financially Sound and Well Managed) नसल्याने अन्य सहकारी बँकांच्या ठेवी स्वीकारण्याच्या नाहीत.

उपसरव्यवस्थापक | SOLAPUR JANATA SAH BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK SOLAPUR | **मुख्य कार्यकारी अधिकारी**

S J S B